सं. फौ. ख. क्र. ३०/२०१५ निशाणी ७१

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. ३ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – नरेंद्र विश्वनाथ शिंदे

वय – ६५ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त

पत्ता – मलकापूर, अकोला, ता. जि. अकोला.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती एस.एस.लोड यांचेमार्फत सरतपास सुरुः**

१. सन २०१४ मध्ये पोलीस स्टेशन उरळ येथे ए.एस.आय. या पदावर कार्यरत होतो. दि. २४.११.२०१४ रोजी दुपारी ०२.०० ठाणेदार श्री. काटकर यांनी आम्हाला माहिती दिली की, कवठा बॅरेज येथे काही इसम अवैधरित्या डिझल टँकर मधुन उपसा करीत आहे, एस.डी.पी.ओ. साहेबांच्या मार्गदर्शनाखाली आपल्याला त्याठिकाणी जावयाचे आहे सोबत चला. त्यानंतर मी, श्री.काटकर आणि इतर पोलीस कर्मचारी असे आम्ही सरकारी वाहनाने घटनेच्या ठिकाणी गेलो. आम्ही गेल्यानंतर त्याठिकाणी एस.डी.पी.ओ. साहेब आले. त्याठिकाणी टँकर क्र. एम.एच.२८ बी ७३४५ मधुन २–३ इसम पाईप लावुन एका अर्धवट जमीनीत गाडलेल्या लोखंडी टाकीत डिझेल काढत होते. सदर टाकी अंदाजे १५–१६ हजार लिटरची असेल. त्या टाकीला पाईप आणि मशिन लागली होती. सदर इसम टँकरच्या ४ नंबरच्या कप्प्यातुन डिझेल काढीत होते. आम्ही गेल्यानंतर त्यांनी त्यांचे काम थांबविले. एस.डी.पी.ओ. साहेबांनी हजर असलेल्या इसमांना टँकर चालकाबाबत विचारपूस केली. तेंव्हा टँकर चालकाने त्याचे नाव जयवंत विजय माने असे सांगितले. दुसरा इसम क्लिनर याने त्याचे नाव राज मोहम्मद असे सांगितले. तिसऱ्या इसमाचे नाव शेट्टी असे होते. एस.डी.पी.ओ. साहेबांनी चालकाला घटनाक्रम विचारला. तेंव्हा टँकर चालकाने सांगितले की, आम्ही गायगाव डेपोतुन ६००० लिटर डिझल आणि ६००० लिटर पेट्रोल निंबा फाटा येथे अग्रवाल पेट्रोल पंप वर घेवुन जाण्यासाठी निघाले. टँकर चालकाने असे सांगितले की, अग्रवाल पेट्रोल पंपचे मॅनेजर रेड्डी यांनी ६००० लिटर पेट्रोल पेट्रोल पंपवर खाली करा आणि ६००० डिझल पैकी फक्त ३००० लिटर डिझल पेट्रोल पंपवर खाली करा, तसेच राहिलेले ३०००

लिटर डिझल कवठा बॅरेज येथील शेट्टीच्या टाकीत खाली करा असे सांगितले होते. आम्ही पोहचे पर्यंत अंदाजे टँकर मधुन १००० लिटर डिझल लोखंडी टाकीत गेले असेल. साधारण २००० लिटर डिझल टँकरमध्ये उरले असेल.

२. त्यानंतर टँकरमधुन आणि लोखंडी टाकीतुन प्रत्येकी तीन ७५० मि.ली.च्या बाटल्यांमध्ये सॅम्पल घेतले. दोन पंचा समक्ष सदर बाटल्या लेबल लावुन सिल केल्या. लोखंडी टाकीतुन डिझल काढुन त्याला देखील सिल केले. त्याठिकाणी श्री. काटकर यांनी घटनास्थळ आणि जप्ती पंचनामे केले. जप्त केलेले टँकर आणि हजर असलेल्या इसमांना घेवुन पोलीस स्टेशनला आलो. त्यानंतर एस.डी.पी.ओ. साहेबांनी फिर्याद दिली. चौकशीकामी माझे बयान घेतले होते. मी सांगिल्याप्रमाणे माझे बयान नोंदविण्यात आले. आरोपी क्र. १ जयवंत विजय माने हजर आहे. (अग्रवाल पेट्रोल पंपचे मॅनेजर) न्यायालयात बाकावर बसलेले उजवी कडुन आरोपी क्र.३ असे साक्षीदाराने सांगितले. त्याचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव कैलास खट्टी असे सांगितले. (कवठा बॅरेजचे मॅनेजर) न्यायालयात बाकावर मध्यभागी बसलेले आरोपी क्र.४ असे साक्षीदाराने सांगितले. त्याचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव रुद्रप्पा पट्टन शेट्टी असे सांगितले. साक्षीदाराने न्यायालयात असलेल्या सर्व आरोपींना चेहऱ्याने ओळखले आहे. राज मोहम्मद या आरोपीस मी ओळखतो. त्याला पाहिल्यास ओळखु शकतो.

सरतपास पूर्ण.

**आरोपी क्र. १ ते ३ यांचे विधिज्ञ पुकाऱ्यावर गैरहजर, आरोपी क्र. १ व ३ हजर, आरोपी क्र. १ ते ३ तर्फे अभिलेखावर मुदतीचा कोणताही अर्ज नाही. सबब त्यांचे विरुध्द उलटतपास नाहीचा आदेश पारीत करण्यात येतो.**

**<u>आरोपी क्र. ४ उलटतपास तर्फे विधीज्ञ श्री. एस.टी.इंगळे यांचे मार्फत</u>**

३. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा करतेवेळी टँकरमध्ये किती डिझेल होते ते मोजले नाही.

प्रश्न - टँकरमध्ये असलेल्या डिझेलची मोजणी कोणत्या यंत्राने केली ?

उत्तर – त्याठिकाणी अन्न पुरवठा विभागाचे अधिकारी व कर्मचारी होते. त्यांनी एस.डी.पी.ओ. साहेबांना टँकरमध्ये अंदाजीत डिझेल असल्याचे सांगितले.

अन्न पुरवठा विभागाचे अधिकारी यांनी टॅंकरमधील डिझेलची मोजणी केली किंवा कसे मला आठवत नाही. आम्ही घटनास्थळी गेल्यानंतर अन्न पुरवठा विभागाचे अधिकारी आले होते. त्यांच्याकडे कोणते साहित्य होते मला सांगता येणार नाही. त्यावेळी कवठा बॅरेजचे काम सुरु होते. कवठा बॅरेज मोठे धरण आहे किंवा कसे मला आठवत नाही. त्याठिकाणी कवठा बॅरेज बांधकामाचे साहित्य, वाहन आणि ५०-६० कर्मचारी उपस्थित होते किंवा कसे मला आठवत नाही. मी न्यायालयात आल्यानंतर बयान वाचले होते. मी बयान वाचुन जेवढे आठवते त्याप्रमाणे पुरावा दिला आहे. लोखंडी टाकीचे मोजमाप केले होते किंवा कसे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि. २४.११.२०२४ रोजी मी श्री. काटकर आणि एस.डी.पी.ओ. साहेब यांचे सोबत हजर नव्हतो म्हणुन मला घटनेबद्दल काहीच माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA
Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2024.09.05 11:04:30 +0530

(श्रीमती डी. एम. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर.

बाळापूर.
दि. ०४/०९/२०२४